उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे कार्यालय,

रा.मा.क्र.४३ एम.आर.सी - ८१/कठोरा बु./२०१८-२०१९.

अर्जदार : श्री.सुरेश गोविंदराव मालविय, रा.राठी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु-१/बांध/कावि १११३/२०१८, दिनांक ३.८.२०१८.

२) सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक बांधपर/मौ.कठोरा बु./ता.व जि.अम./स.नं.७४/५ / भु.क्र.१/ससंनर-अम/१५४८, दिनांक ३.९.२०१८.

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु-१/बांध/कठोरा बु./कावि१२१०/२०१८ दि.१४.९.२०१८.

२) सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक प्रा.यो.अम./मौ.कठोरा बु./स.नं. ता.व जि.अम./स.नं.७४/५/सहसंचाअम/११९९,अमरावती दिनांक ३.११.२०१८.

४) अर्जदार भुखंडधारक यांचा अर्ज दिनांक १४.११.२०१८.

५) या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु-१/बांध/कावि १४७८/२०१८, दिनांक २७.११.२०१८.

६) सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक बांधपर/मौ.कठोरा बु./ता.व जि.अम./स.नं.७४/५ / भु.क्र.१/ससंनर-अम/१५४८, दिनांक ३.९.२०१८

आदेश

(आदेश पारीत दिनांक १८ / ०२/२०१९)

अर्जदार श्री.सुरेश गोविंदराव मालविय, रा.राठी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे अर्जानुसार मौजे, कठोरा बु., ता.जि.अमरावती येथील शेत भुमापन क्रमांक ७४ भूमापन विभागाचा उपविभाग ५, भोगवटदार वर्ग १ मधील एकूण क्षेत्र ३.१२ हे.आर. या अकृषक झालेल्या जागेमधील प्लॉट क्रमांक १ क्षेत्रफळ १६२६.८६ चौ.मि. या जागेवर २५७५.८७४ चौ.मि. जागेवर बांधकाम करण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत नोंदणीकृत खरेदी खत, गांव नमुना ७/१२, प्रस्तावित बांधकाम नकाशा इत्यादी सोबत जोडले आहे.

सदर प्रकरणी या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचा अहवाल मागविण्यात आला.

सहायक संचालक नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय, अमरावती यांचे पत्र.जा.क्र.बांधं.पर./मौ.कठोरा बु. /ता.व जि.अम./स.नं.७४/५/भु.क्र.१/ससंनर-अम/१४४, दि.१९.१.२०१९ नुसार पत्रातील अटी व शर्तीनुसार बांधकामास शिफारस केलेल्या पत्राची मुळ प्रत व बांधकाम अभिन्यासाच्या मंजूरीच्या शिफारस प्रती प्राप्त झाल्या आहे.

त्याअन्वये सहायक संचालक नगर रचना (मुल्यनिर्धारण विभाग) अमरावती यांनी वरील पत्रान्वये खालील अटी व शर्तीसह बांधकाम परवानगी करीता नाहरकत दिलेली आहे.

१) सदरहू भूखंडाचे मालकी हक्क वारसा हक्क व हक्क सोड या संबधाने अर्जदार यांनी महसूल विभागास खातरजमा करुन द्यावी.

२) सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचेकडील यापूर्वीचे पत्र क्र.९५४ दि.१७.५.२०१८ मधील त्याचप्रमाणे दिनांक ३०.५.२०१८ रोजीच्या अकृषक आदेशातील सर्व अटी / शर्ती यापुढेही अर्जदार भुखंडधारक / विकासकर्ते यांचेसह सर्व संबधितावर बंधनकारक राहतील.

२) प्रादेशिक योजना, क्षेत्रासाठी शासनाच्या नगर विकास विभागाचे दिनांक २१.११.२०१३ पासून लागू केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.२.१९ नुसार उपरोक्त क्षेत्रासाठी सुरक्षा अनामत ठेव जमा करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी याबाबतचे दर व कार्यपध्दती अद्याप शासनाकडून विहीत करण्यात आलेली नाही. त्यामूळे संबंधित अर्जदार /भुखंडधारक यांचे कडून बंधपत्र बांधकाम नकाशा मंजूरीपूर्वी सादर करावे. सदर बंधपत्र सादर करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३) विषयांकित बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असना-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारा, नकाशा, अभियंत्याचे अनुज्ञप्ती पत्र इत्यादी) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्ययावत नोंदबाबत अर्जदार/ विकासकर्ता यांनी महसूल विभागास अवगत करावे.

४) प्रस्तुत बांधकाम नकाशांना मंजूरी अदा केल्यानंतर व बांधकाम परवानगी दिल्यानंतर सदर परवानगी ही एक वर्षाकरीता वैध राहील. त्यानंतर मुदतवाढ घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

५) आपणांस देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी प्रमाणे बांधकाम सुरु असल्याची तपासनी नियमाप्रमाणे वेळोवेळी महसूल विभागास अवगत करावे. तव्दतच जोता तपासनी व भोगवटा

..२/-

प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदार / भुखंडधारक यांचेवर बंधनकारक राहील.

६) अकृषक परवानगी आदेशातील सर्व अटी/शर्ती अर्जदार /भुखंडधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) मंजूर प्रादेशिक योजना, अमरावती करीता लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीप्रमाणे बांधकाम करणे व विषयांकित मंजूर वापराकरीताच सदर बांधकामाचा वापर करणे अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांचेसह सर्व संबधितांवर बंधनकारक राहील.

८) मंजूर नकाशाप्रमाणेच बांधकाम करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / भुखंडधारक यांचेवर राहील. अन्यथा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अनधिकृत बांधकामावर रितसर कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडून प्रस्तावित करण्यात येईल.

९) आजुबाजूचे वहिवाटीला बाधा होणार नाही याची दक्षता अर्जदार/भूखंडधारक/विकासकर्ते यांनी घेणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार व मा.जिल्हाधिकारी अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुतचे बांधकाम करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्याचे जमीनीमध्ये पूनर्भरन करण्याचे प्रकल्पाचे (Rain Water Harvesting) बांधकाम करणे अर्जदार / भुखंडधारक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

११) सौर उर्जेवर पाणी तापविने व अग्नीशमन व्यवस्था, प्रस्तावित उदवाहिनी इत्यादी बाबी विकसीत करणे अर्जदार / भुखंडधारक /विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील व त्या भोगवटा प्रमाणपत्र घेणेपूर्वी वापर योग्य विकसीत करणे त्यांचेवर बंधनकारक राहील. या सुविधा वापरना-या सर्व सबंधीतावर उक्त सुविधा विकसीत झाल्यानंतर व वापरात आल्यानंतर सुस्थितीत व वापरात ठेवणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१२) बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर नकाशावर नमुद केल्या व्यतीरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबधित देखरेख करणारे वास्तुशिल्पी व अर्जदार /भुखंडधारक विकासकर्ते जबाबदार राहतील.

१३) प्रस्तावासोबतच्या उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे सहायक संचालक नगररचना अमरावती यांनी शिफारस केली आहे. सदरहू कागदपत्रे खोटी वा दिशाभूल करणारे असल्यास त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम केले असल्यास सदरची शिफारस रद्द् समजन्यात येईल.

१४) शासनाचे विविध स्वरुपातील कामगार कल्याण उपकरांसह अन्य कर सक्षम प्रधिकरण म्हणजे महसूल विभागाकडे अर्जदार/ जमीनमालक यांनी भरणे आवश्यक व बंधनकारक राहील व अशा करांचा भरणा सक्षम प्राधिकारी म्हणून आपले स्तरावर करुन घेणे अभिप्रेत व आवश्यक आहे.

<u>वरील अटी व शर्तीनुसारच आवेदकास जोता पातळी (Plinth Level) पर्यत बांधकामाची परवानगी देण्यात येत आहे. त्यानंतर जोता तपासनी प्रमाणपत्र घेऊनच पुढील बांधकाम परवानगी प्राप्त करुन घ्यावी.ज्योत्यापासून पुढे बांधकाम परवानगी न घेता बांधकाम केल्याचे निदर्शनात आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.</u>

उपविभागीय अधिकारी,
अमरावती.

प्रतिलीपी :

१. मा.जिल्हाधिकारी अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. तहसिलदार, अमरावती.
३. सहायक संचालक नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग शाखा कार्यालय, अमरावती
४. उपअधिक्षक भूमी अभिलेख अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सचिव ग्रामपंचायत कठोरा बु., ता.जि.अमरावती.
६. तलाठी मौजे कठोरा बु, ता.जि.अमरावती.
७. श्री.सुरेश गोविंदराव मालविय, रा.राठी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती.

SUB-DIVISIONAL OFFICER

उपविभागीय अधिकारी,